# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापित राज्यविद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**परीक्षा व मुल्यमापण मंडळ (गोपनिय)**

फोन:– ०७१३२.२२३३५०

Email:- confidential.section@unigug.ac.in


गोवि/प.मु.मं/गोप/जा.क्र./३१२/२०२३

दिनांक १३/०७/२०२३

## परिपत्रक

विषय:— महाविद्यालयांना प्रात्यक्षिक परीक्षेकरीता लागणारा निधी विद्यापीठातर्फे पुरविण्याबाबत.

संदर्भ:— दिनांक १७/०१/२०२३ रोजी आयोजीत मा. अधिसभेतील निर्णय

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालय तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की गोंडवाना विद्यापीठा अंतर्गत सत्र हिवाळी व सत्र उन्हाळी परीक्षेमध्ये लेखी परीक्षेच्या अगोदर प्रात्यक्षिक परीक्षा आयोजीत केली जाते सदर प्रात्यक्षिक परीक्षेमधील आंतर्गत व बहीर्गत परीक्षकांना तातडीने मानधन देण्याकरीता सर्व महाविद्यालयांना प्रात्यक्षिक परीक्षेच्या ०८ दिवसा आधी लागणारा निधी अग्रिम रुपात देण्यात यावे असा मा. अधिसभेमध्ये निर्णय घेण्यात आलेला असुन सर्व महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक परीक्षेतील सर्व अंतर्गत व बहीर्गत परीक्षकांना विद्यापीठ नियमानुसार देण्यात येणाऱ्या मानधनाचे अंदाजपत्रक तयार करुन अग्रिम मागण्याकरीता प्रात्यक्षिक परीक्षेच्या १५ दिवसाचे अगोदर गोपनिय विभागाला प्राचार्यांच्या स्वाक्षरीने सादर करावा. त्यानुसार सदर निधी महाविद्यालयांना पुरविण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**टिप**

१. सबंधीत महाविद्यालयांनी निधी मागण्याकरीता अंदाज पत्रकासह निवेदन प्रात्यक्षिक परीक्षेच्या १५ दिवस अगोदर विभागाला सादर करावे.
२. सदर अग्रिम राशीचे समायोजन महाविद्यालयातील प्रात्यक्षिक परीक्षा संपल्या नंतर ०८ दिवसाचे आत परीक्षा विभागाला सादर करावे.
३. परीक्षकांचे मानधन विद्यापीठ नियमानुसारच देण्यात यावे याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.
४. आधी घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या अग्रिमाचे समायोजन केल्या शिवाय दुसऱ्या परीक्षेकरीता अग्रिम दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१३/७/२३

(श्री. देवेंद्र झाडे)
संचालक (प्र.)
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:—

१. मा. कुलगुरु महोदय, यांना माहीतीस सविनय सादर.
२. मा. प्र—कुलगुरु महोदय, यांना माहीतीस सविनय सादर.
३. मा. कुलसचिव, यांना माहीतीस सविनय सादर.
४. मा वित्त व लेखा अधिकारी, यांना माहीतीस सविनय सादर.
५. गोंडवाना विद्यापीठाशी सलग्नित सर्व महाविद्यालय व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस सादर.

(डॉ. संदेश सोनुले)
सहाय्यक कुलसचिव
गोपनिय विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली